<u>म.कौ.हिं. स.का.अर्ज क्रं.१४५/२०२०</u>
शुंभागी चौगुले वि. महावीर चौगुले
सी.एन.क्र.**MHKO**030072922020

## <u>निशाणी १३ वरील आदेश</u>

(पारित दिनांकः ०४ मार्च, २०२३)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने तिला दरमहा रक्कम रु.१००००/- अंतरिम पोटगी व औषधोपचाराकरिता रु.५०००/- मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. **<u>अर्जदार हिचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>**

अर्जदार क्र. १ हिचा वि.प. क्र. १ याच्यासोबत दिनांक ११.०५.२००४ रोजी विवाह झाला आहे. लग्नाच्या काही दिवसानंतर वि.प. याने अर्जदार हिस मारहाण करणे चालू केले. अर्जदार हिला वि.प.१ याचे खिशात प्रेमपत्र सापडलेने त्याबाबत त्याला विचारले असता तीस जबर मारहाण करण्यात आली व तिला घरातून हाकलून दिले. अर्जदार हिच्या नातेवाईकांनी वि.प. यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता वि.प. यांनी त्यांना अपमानित करुन पाठवून दिले व काही दिवसानंतर वि.प. क्र.१ याने अर्जदार हिच्या घरी व अर्जदार हिच्या वडिलांच्या कामाचे ठिकाणी पैसे मागण्याकरिता जावू लागला. अर्जदारने मारहाणीबाबत पोलीस अधिक्षक महिला सहाय्य कक्ष स्थानिक अन्वेषण शाखा कोल्हापूर यांच्याकडे तक्रारी अर्ज दिला असून सन २०१७ मध्ये वि.प.क्र. २ यांना ह्रदय विकाराचे झटका आलेने अर्जदार त्याना पाहण्यास गेल्या असता तिच्याशी भावनिक बोलणी केलेने व वडीलांनी समजूत काढल्याने ती पुन्हा नांदण्यास गेली. त्यानंतरसुध्दा वि.प. यांनी पुर्वीप्रमाणे भांडण करणे सुरु ठेवले. दिनांक १०.७.२०१९ रोजी वि.प. यांनी तिला बेशुद्ध होईपर्यंत मारहाण केलेने तिला सीपीआर हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. त्याबाबत तिने पोलीस स्टेशनमध्ये एनसीआर नोंद केला आहे.

३. अर्जदारचे पुढे असे कथन आहे की, वि.प. १ हा नोकरी करत असून त्याला दरमहा १००००/– रुपये पगार मिळतो. वि.प.नं. ३ यांचे नावे उचगांव येथे खोल्या असून भाडयापोटी त्यांना ५०००/– रुपये उत्पन्न मिळते. तसेच वि.प.क्र. १ व ४ यांचा फोटोग्राफीचा एकत्रीत व्यवसाय असून दरमहा रु. ५०,०००/– इतके उत्पन्न मिळते. त्याचेवर वि.प.क्र. १ वर अर्जदाराशिवाय इतर कोणाचीही जबाबदारी नाही. वि.प. याने कुठल्याही संयुक्तीक कारणाशिवाय अर्जदारांचा त्याग केला आहे. अर्जदार याना कोणतेही उत्पानाचे साधन नाही. अर्जदार ही माहेरी भाडयाने खोली घेवून रहात असून वि.प. यांनी तिला नांदवण्याबाबत कोणतेही प्रयत्न केले नाहीत तसेच तिच्या पोटापाण्याची, कपडयाल्यांची, औषणपाणी याची तजवीज केलेली नाही.त्यामुळे अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाकरीता व जीवनावश्यक बाबींची पुर्तता होण्याकरीता तसेच ती कॅन्सरग्रस्त असल्याने उपचाराकरीता खर्च ठरवून मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

४. वि.प. याने नि. १२ वर मूळ अर्जास लेखी म्हणणे दाखल करून नि.१५ वर पुरसिस दाखल करुन नि.१२ मधील मजकूर सदर अर्जाचे लेखी म्हणने समजण्यात यावे असे कळविले. वि.प. यांनी अर्जदारांसोबत त्याचे नातेसंबंध वगळून इतर सर्व बाबी नाकारल्या आहेत. वि.प. याच्या कथनानुसार अर्जदार ही तिचे मर्जीनुसार २००९ पासून माहेरी रहात असल्याने तिला मारहाण करण्याचा प्रश्नच नाही. अर्जदार ही चैनीखोर, हेखेकोर व स्वतःचे मनाप्रमाणे वागणारी असल्याने तिने घरातील लोकांशी पटवून ने घेणे, मनाला येईल तेव्हा माहेरी जाणे असे प्रकार करु लागल्याने तिला त्याबाबत विचारणा केली असता शिवीगाळ करत व आरेरावीची भाषा वापरत होती. सन २००९ साली दोन्ही मुलांना सोडून माहेरी निघून गेली असून त्यांच्या शिक्षणाची व पालनपोषणाची सोय वि.प. करत आहे.

५. दिनांक ११.०७.२०१९ रोजी अर्जदार व तिचे नातेवाईकांनी वि.प.चे घरी येवून घरावर दगडफेक केली तसेच घरातील प्रापंचिक साहित्याची तोडफोड केली व वि.प. क्र. १ ते ५ यांना मारहाण करुन मुलगा योगेश याला बळजबरीने घेवून गेले. त्याबाबत त्यांनी

करवीर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३६२/२०१९ चा गुन्हा दाखल केला असून त्या गुन्हयातून सुटका होण्यासाठी प्रस्तुतचा चुकीचा व बनावट अर्ज केला आहे. अर्जदारच्या कृत्यामुळे वि.प.क्र. २ हे मयत झाले आहेत. अर्जदार ही नर्सिंगची नोकरी करत असून तिला चांगला पगार असल्याने तिचा उदरनिर्वाह करण्यास ती समर्थ आहे. याउलट अर्जदार व तिचे नातेवाईकांनी मारहाण केलेने त्याची तब्येत बरी नसते व तो कोणताही कामधंदा करत नाही व त्यांची कोणतीही वाडवडीलार्जीत सामाईक मिळकत नाही व वि.प.क्र. ४ याला मिळणा–या तुटपुंज्या उत्पन्नातून त्यांचा उदरनिर्वाह चालतो. सबब वि.प. यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

६. अर्जदार व वि.प.तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाची पाहणी केली असता माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. मी त्यावरील निष्कर्श खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही तिचे वि.प. यांच्यासोबत कौटुंबिक संबंध असल्याचे सिध्द करते काय ? | ... होय. |
| २. | अर्जदार ही त्यांच्यावर वि.प. याने कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | ... होय. |
| ३. | अर्जदार ही तिने मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | ...अंशतः होय. |
| ४ | अर्जदार ही तिने मागणी केल्याप्रमाणे उपचाराकरीता मासिक रक्कम ठरवून मिळण्यास पात्र आहे काय? | ...अंशतः होय. |
| ५. | आदेश काय ? | ... अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबत –

७. सदरचा अर्ज हा उभयपक्षांचा साक्षीपुरावा सादर होण्यापूर्वीचा असल्याने अर्जदार हिला तिचे वि.प. सोबत कौटुंबिक संबंध आहेत व ती त्याच्या हाती कौटुंबिक हिंसाचारास बळी पडली आहे या बाबी प्रथमदर्शनी सिध्द करणे गरजेचे असते. या अनुषंगाने दोन्ही पक्षांचे कथनांचा विचार केला असता त्यांच्यामध्ये कौटुंबिक संबंध असल्याची बाब वादग्रस्त नसल्याचे दिसून येते. कौटुंबिक संबंधाबाबत वाद नसलेने मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्श होकारार्थी देत आहे.

### मुद्दा क्र.२ बाबत–

८ सदरचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाचे कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. कलम २३ (१) नुसार न्यायालयास त्याच्यापुढील या कायद्यातील कुठल्याही कार्यवाहीमध्ये न्याय्य व योग्य अंतरिम आदेश पारित करता येतो. अर्जदार हिने वि.प.क्र.१ याचे दुस–या स्त्रीशी प्रेमसंबंध आहेत, त्याने शिवीगाळ, मारहाण केल्याचे कथन केले आहे. तर वि.प. याने अर्जदार हिला वारंवार माहेरी निघून जात असल्याचे वि.प. सोबत भांडण काढत असल्याचे कथन करुन खोटी केस दाखल केल्याचे कथन केले आहे.

९. दोन्ही पक्षांनी एकमेकांविरुध्द बरेच गंभीर आरोप केले असून निश्चितच त्यावर दोन्ही पक्षांचा साक्षपुरावा झाल्यानंतरच निर्णय देता येईल. या क्षणी केवळ हे पाहणे गरजेचे आहे की, अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते किंवा नाही. या अनुषंगाने अभिलेखाची पाहणी केली असता संरक्षण अधिकारी यांनी कौटुंबिक घटना अहवाल दाखल केला असल्याचे दिसून येते. सदरच्या अहवालावरुन अर्जदारवर हिच्यावर शारीरिक, शाब्दिक, भावनिक, लैगिंक, आर्थिक हिंसाचार केल्याचे

नमूद करण्यात आले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये लग्नानंतर पत्नी हिच्या करिता तिचा पती व त्यांचा संसार हा सर्वस्वी माणला जातो. अशा परिस्थितीत कुठलीही स्त्री दोन अपत्य झाल्यानंतर कुठल्याही सबळ कारणाशिवाय तिच्या पतीपासून वेगळी राहिल व त्याचेविरुध्द पोलीस स्टेशन येथे तक्रार करेल ही बाब पटणेजोगे नाही. अर्जदार हिने अर्जात तिच्यावर झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराबाबत केलेली कथने प्रथमदर्शनी विश्वासर्ह वाटते. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ चे निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

## मुद्दा क्र.३ बाबत–

१०. पती या नात्याने पत्नीच्या संगोपणाची नैतिक व कायदेशीर जवाबदारी ही वि.प.क्र.१ याची आहे. वि.प.क्र.१ याने अर्जदार ही त्याच्यापासून विभक्त झाल्यानंतर तिच्या पालन पोषणाची कुठलीही व्यवस्था केली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वि.प.क्र.१ हा नोकरीस असून त्याला दरमहा १००००/– रुपये पगार मिळत असल्याचे, खोल्यांचे भाडेतून मासिक रु.५०००/–उत्पन्न मिळत असल्याचे तसेच फोटोग्राफीच्या व्यवसायातून दरमहा रु.५०,०००/– उत्पन्न मिळत असल्याचे कथन अर्जदारने केले आहे. अर्जदारने नि. २० वर अकृषक व मालमत्ता व देणी बाबतचे शपथपत्र दाखल केले असून त्यामध्ये तिला मासिक १०,०००/– व अवलंबून असणा–या मुलांचा खर्च रु.५०००/– खर्च येत असल्याचे कथन केले आहे व वि.प. हा खाजगी नोकरी करुन १५,०००/–रुपये मिळवत असल्याचे कथन केले आहे.

११. या अनुषंगाने वि.प. याचे कथन व त्याने दाखल केलेले अकृषक व मालमत्ता व देणी बाबतचे शपथपत्र पाहिले असता अवलंबीत असणा–या व्यक्तींना दरमहा १५,०००/–खर्च व मुलगा यश च्या शिक्षणासाठी मासिक ५,०००/– खर्च करावा लागत असल्याचे कथन केले आहे. वि.प. याने मा. सर्वोच्च न्यायालयाचे रजनीश वि. नेहा या प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे त्याच्या शपथपत्रासोबत आवश्यक दस्त दाखल केले नाहीत. वि.प. याच्या उत्पन्नाबाबत अर्जदार हिने कुठलाही कागदोपत्री पुरावा जरी अभिलेखावर

दाखल केला वि.प. क्रं.१ हा शारीरिक व मानसिक दृष्टया सुदृढ व्यक्ती असून तो पती या नात्याने अर्जदारच्या पालनपोषणाची जबाबदारी नाकारू शकत नाही. अर्जदार हिच्या कथनावर याक्षणी अविश्वास दाखविण्याचे कुठलेही कारण दिसून येत नाही. अर्जदार हिने केलेले कथनांवरुन वि.प. यांची आर्थिक परिस्थिती सुदृढ असल्याचे दिसून येते. अर्जदार हिला वि.प. याच्याच राहणीमानानुसार जगण्याचा अधिकार आहे. वि.प. याने अर्जदार ही नोकरी करत असल्याचे कथन केले आहे. परंतु त्याने त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. वि.प. याने त्याचे शपथपत्रात अर्जदार ही हॉस्पीटल येथे नर्सचे काम करित होती असे कथन केले आहे. या वरुन सध्या अर्जदार ही कोठेही काम करित नसल्याचे स्पष्ट होते. अर्जदार हिने तिला कॅन्सर झाल्याचे कथन करुन त्याबाबत दस्त सुध्दा दाखल केले आहे. त्यामुळे ती शारीरिकदृष्ट्यासुध्दा कमकुवत असल्याचे स्पष्ट होते.

१२. अभिलेखावर दोन्ही पक्षानी एकमेकाच्या उत्पन्नाबाबत कथन केले असले तरी बाबत कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. सदरचे प्रकरण अंतिम निकाली लागण्याकरीता बराच कालावधी लागणार आहे. अर्जदार ही वि.प.क्र. १ पासून विभक्त रहात असल्याची बाब वादग्रस्त नाही. पती या नात्याने अर्जदारच्या उदरनिर्वाहाची तसेच कपडे लथ्थे, औषधोपचार इत्यादीची व्यवस्था करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी वि.प.क्र.१ याची आहे परंतु ती जबाबदारी तो पार पाडत नसल्याचे स्पष्ट होते. उभयपक्षांना दोन मुले असून दोघांकडे एक–एक मुलगा असल्याची बाब वादग्रस्त नाही. अर्जदार हिने स्वतःकरिता १०,०००/– अंतरिम पोटगीची मागणी केली आहे. तिने जरी वि.प.क्र.१ याच्या उत्पन्नाबाबत कथने केली असली तरी त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. पोटगीची रक्कम ठरवितेवेळी वि.प. यांचा राहणीमान, अर्जदार हिच्या गरजा तसेच वि.प. याची त्या गरजा पूर्ण करण्याची ऐपत या सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक असते. अर्जदार हिला दरमहा १०,०००/– रु कोणकोणत्या कामाकरिता पाहिजे याचे विस्तृत वर्णन तिचे शपथपत्रात दिलेले नाहीत. वरील सर्व परिस्थिती पाहून आजच्या परिस्थितीत दैनंदिन जीवन जगण्याकरीता आवश्यक असलेल्या

बाबींचा विचार केला असता अर्जदार हिला दरमहा र.रु.३०००/– देण्याचा आदेश करणे मला रास्त वाटते. सबब मी मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी देत आहे.

## मुद्दा क्रमांक ४ बाबत–

१३. प्रस्तुत अर्जात अर्जदार हिने ती कॅन्सरग्रस्त असून तिला उपचाराकरीता बराच खर्च करावा लागत असून तिला औषधोपचाराकरीता मासिक रु.५०००/– खर्च म्हणून दयावे अशी मागणी केली आहे. आपले कथनांचे पुष्टयर्थ निशाणी १९ सोबत शासकीय मेडीकल कॉलेज मिरज येथील हिस्टोपॅथॉलाजीकल रिपोर्ट व के ॲन्ड आर नर्सिंग सेंटर प्रा. लि. सन राईज हॉस्पीटल चे डिस्चार्ज समरी दाखल केली आहे. त्यावरुन अर्जदार हिला कॅन्सर चा आजार असल्याचे दिसून येते. अर्जदार हिने जरी तिला दरमहा उपचाराकामी येत असलेल्या खर्चाचा तपशील दाखल केला नसला तरी काहीतरी खर्च तिला निश्चित लागत असावा. अर्जदार हिला असलेल्या गंभीर आजाराचा विचार केला असता सद्यस्थितीत तिला दरमहा रु.२०००/– उपचाराकामी देण्याचे आदेश करणे मला रास्त वाटते. सबब मी मुद्दा क्र.४ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी देत आहे.

## मुद्दा क्रमांक ५ बाबत–

१४. मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्षास्तव अर्जदार यांना कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याचे कलम २३ नुसार वि.प. यांचे राहणीमान व अर्जदार यांच्या मूलभूत गरजा लक्षात घेता मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वि.प. यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी कोणत्याही प्रकारे अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार करु नये.

३. वि.प.क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.३,०००/– अर्जाच्या तारखेपासून मूळ अर्ज निकाली लागेपावेतो पोटगी द्यावी.

४. वि.प.क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.२,०००/– औषधोपचाराकरीता अर्जाच्या तारखेपासून मूळ अर्ज निकाली लागेपावेतो दयावा.

५. अर्जदार हिला निर्देशीत करण्यात येते की, तिने मुळ अर्जावर विनाविलंब तिचा साक्षीपुरावा सादर करावा.तसे न केल्यास अंतरिम आदेशाबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

६. आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयातील कलम २४ नुसार विनामुल्य देण्यात यावी.

७. सदरच्या अर्जाच्या खर्चाबाबत आदेश अंतिम आदेशाच्यावेळी करण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MAHESH MANOHAR PALSAPURE
Date: 2023.01.14 03:06:23 +0530

दि.०४/०२/२०२३. (एम.एम.पळसापुरे)

कोल्हापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी(कोर्ट क्र.३),

कोल्हापूर.